# बालशिक्षणावरील खर्चाचा वाटा समाजानेही उचलावा

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेने बालशिक्षणविषयक धोरण ठरविण्यासाठी आणि त्यासाठी अशासकीय तज्ञांची समिती नेमण्यासाठी शासनाकडे आग्रह धरला आणि त्याला तातडीने प्रतिसाद देऊन शिक्षणमंत्री श्री. सुधीर जोशी यांनी अशी समिती त्वरेने निर्माण केली यासाठी पहिले धन्यवाद. आणि राज्यस्तरीय बालशिक्षण समितीने आपला अहवाल शिक्षणमंत्र्यांना सादर करून पंधरा दिवस होण्याच्या आतच, राज्याच्या नवीन शिक्षणविषयक धोरणात या समितीच्या शिफारशींचा समावेश करून, मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांनी समितीच्या सर्व शिफारशी शासनाने स्वीकारल्याचे जाहीर केले यासाठी पुन्हा एकदा धन्यवाद. शासन विशेषतः शिक्षणाच्या संदर्भात इतक्या तातडीने निर्णय घेते, ही गोष्ट आपल्या सरावाची नव्हती म्हणूनच बालशिक्षणाच्या संदर्भातील राज्यस्तरीय समितीच्या शिफारशी पूर्णांशाने स्वीकारण्याचे धाडस दाखविणाऱ्या महाराष्ट्र शासनास धन्यवाद देणे हे आपले कर्तव्यच आहे.

धन्यवादास पात्र होणाऱ्या महाराष्ट्र शासनाने या आपल्या कृतीने त्वरेने नि गांभीर्याने शिक्षणविषयक मूलभूत निर्णय घेण्याचा नवा पायंडा पाडला आहे. त्याचबरोबर अर्थातच फार मोठी जबाबदारीही स्वीकारली आहे ही गोष्ट विशेष करून शासनाच्या लक्षात आणून द्यायला हवी. ही जबाबदारी दुहेरी आहे. एक म्हणजे, राज्यस्तरीय बालशिक्षण समितीने (प्रा.राम जोशी समितीने) सुचविलेल्या बालशिक्षणविषयक व्यापक दृष्टिकोणास शासनाने मान्यता दर्शविली आहे. आणि दुसरे म्हणजे शिफारशी अंमलात आणण्यासाठी आवश्यक त्या वाढत्या साधनसामुग्रीची तरतूद करण्याचीही जबाबदारी स्वीकारली आहे. शिक्षणविषयक व्यवहाराच्या दृष्टीने या दोन्ही जबाबदाऱ्या फार महत्त्वाच्या आहेत.

**प्रा.जोशी समितीचा बालशिक्षणविषयक दृष्टिकोण**

केवळ बालशिक्षण आणि तेही साकल्याने विचार करणारी प्रा. राम जोशी समिती ही पहिलीच समिती होती. यापूर्वी स्वातंत्र्यपूर्व काळात काय किंवा स्वातंत्र्योत्तर काळात काय अनेक शिक्षणविषयक समित्या केंद्र किंवा राज्य सरकारांनी नियुक्त केल्या होत्या. परंतु या सर्व समित्यांनी आपापल्या अहवालांतून बालशिक्षणाचा सूत्रबध्द आणि अनेकांगांनी विचार केला नव्हता. किंबहुना जवळजवळ सर्वच समित्यांनी बालशिक्षणाला स्वतंत्र महत्त्व न देता प्राथमिक शिक्षणाला मदतरूप ठरणारे शिक्षण म्हणूनच त्याचा विचार केलेला आढळतो. आजपर्यंत शिक्षणाचा सुरुवातीचा स्तर म्हणून प्राथमिक शिक्षणासच अग्रस्थान दिलेले दिसून येते. बालशिक्षण हा स्वतंत्ररित्या विचारात घेण्याचा विषय आहे, एवढेच नव्हे तर तो सर्व शिक्षणाला नि मनुष्य जीवनाला पायाभूत असलेला असा शिक्षणाचा स्तर आहे ही मांडणी प्रा. राम जोशी समितीनेच प्रथमतः केली आहे.

जून १९५७ मध्ये 'पूर्व प्राथमिक शिक्षण आणि प्रशिक्षणाचे शिक्षण 'यांचे अभ्यासक्रम करण्यासाठी नेमलेली सुलभा पाणंदीकर समिती आणि लगेचच १९५८ साली नेमलेली जे.पी.नाईक 'एकसूत्रीकरण समिती' यांनी बालशिक्षणाच्या राज्यातील विकासासाठी तीन सूत्रे मांडली होती.

१. शासनाने बालशिक्षणाच्या संदर्भात मार्गदर्शनाची भूमिका घ्यावी आणि तिच्या अंमलबजावणीसाठी एक स्वतंत्र मंडळ निर्माण करावे.

२. बालशिक्षणाचे म्हणजे बालशाळा चालविण्याचे आणि शिक्षकवर्ग तयार करण्यासाठी प्रशिक्षण संस्था चालविण्याचे काम खाजगी संस्थांकडेच असावे.

३. शासनाने खाजगी संस्थांना बालशिक्षणासाठी उदार अनुदाने द्यावीत.

हीच तीन सूत्रे प्रस्तुत राज्यस्तरीय बालशिक्षण समितीने आपल्या शिफारशी करताना डोळयासमोर ठेवली आहेत.समितीने वेगवेगळया शिफारशी करताना त्यामागे ठेवलेला दृष्टिकोण लक्षात घेणे जरुरीचे आहे. बालशिक्षणाचे धोरण ठरविताना बालशिक्षणाचे पायाभूत महत्त्व लक्षात घ्यावे. शासनाने नियमावली घालून द्यावी, बालशिक्षण व्यवहारावर शासनाचा व्यापक असा अंकुश असावा, परंतु प्रत्यक्ष बालशिक्षणाचा व्यवहार मात्र स्वेच्छाकार्य करणाऱ्या संस्थांकडे सुपूर्त करावा, यामुळे आवश्यक ती निर्बंधांची चौकट तर निर्माण होईलच, पण त्याचबरोबर त्या चौकटीअंतर्गत स्वेच्छासंस्थांना लवचीक आणि प्रयोगशील शिक्षणाचे वातावरण राखता येईल हा शालेयपूर्व शिक्षणाविषयीचा समितीचा दृष्टिकोन आहे. येथे शासन आणि स्वेच्छाकार्य संस्था यांचे कार्य परस्परपूरक आणि बालशिक्षणपोषक व्हावे ही त्यामागची भूमिका आहे.

शिक्षणक्षेत्रात शासनाचा वावर मर्यादित असावा असे म्हणताना या समितीने बालशिक्षणाच्या कार्याचा भार शासनाच्या शिक्षणखात्यावर न ढकलता त्यासाठी स्वतंत्र 'महाराष्ट्र बालशिक्षण मंडळ' ही स्वायत्ता संस्था निर्माण करण्याची सूचना केली आहे. एवढेच नव्हे तर, शासनाच्या वतीने बालशिक्षणविषयक सर्व सूत्रे या मंडळाकडे द्यावीत आणि त्यात शासनाचा हस्तक्षेप कमीत कमी असावा असा दृष्टीकोण प्रस्तुत समितीने मांडला आहे. म्हणजे कायदा शासनाचा, त्याची अंमलबजावणी स्वायत्त संस्थेची आणि बालशाळा आणि शिक्षक - प्रशिक्षण केंद्रे यांचा प्रत्यक्ष व्यवहार खाजगी स्वेच्छाकार्य संस्थांकडे अशी समितीने बालशिक्षणविषयक भूमिकेची मांडणी केलेली आहे. वेगळया भाषेत असेही म्हणता येईल की बालशाळा नि शिक्षक-प्रशिक्षण केंद्र प्रामुख्याने खाजगी संस्थांकडे असावीत, त्यांच्यावर स्वायत्त मंडळाचा अंकुश असावा आणि हा अंकुश शासनाच्या कायद्याने ठरवून द्यावा अशी ही बालशिक्षणविषयक त्रिस्तरीय व्यवस्था राज्यस्तरीय बालशिक्षण समितीने आपल्या शिफारशी मांडताना डोळयांसमोर ठेवली होती.

शासनाने कायदा करताना स्वायत्त मंडळाने त्याची अंमलबजावणी करताना आणि खाजगी स्वेच्छासंस्थांनी शाळा चालविताना हा दृष्टिकोन व्यवहारात जोपासण्याची जबाबदारी सांभाळायला हवी आहे.

बऱ्याचदा अनुभव असा येतो की, शिक्षणविषयक समित्या अभ्यासपूर्ण शिफारशी करण्याचे आपले काम करतात. परंतु शासकीय पातळीवर त्याच्या आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या बाबतीत कच खाण्याकडेच नोकरशाहीचा कल असतो. प्रा. राम जोशी समितीच्या सर्व शिफारशी जशाच्या तशा स्वीकरण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे, तेव्हा त्याचा आर्थिक व्यापही सांभाळण्याचे धैर्य शासन दाखविल अशी आपण आशा करू या. समितीच्या सर्व शिफारशी अंमलात आणण्याचा एकूण वार्षिक खर्च हा एकूण शिक्षणविषयक खर्चाचा फारच अल्प भाग आहे. शिवाय बालशिक्षणाचे मानवी विकासात असलेले पायाभूत महत्त्व लक्षात घेतले तर तो अत्यावश्यक स्वरूपाचा खर्च आहे अशी समितीची भूमिका आहे.

बालशिक्षण समितीने सुचविलेल्या विविध शिफारसींमुळे शासनावर तीन त-हेच्या खर्चाचा बोजा पडणार आहे. एक म्हणजे स्वायत्त मंडळ कार्यान्वित करण्याचा नि चालविण्याचा खर्च, दुसरा म्हणजे बालशाळांना द्यावयाच्या अनुदानांचा खर्च आणि तिसरा म्हणजे मागासलेल्या ग्रामीण नि आदिवासी भागातील बालशिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी करावा लागणारा खास खर्च. या सर्व एकत्रित खर्चाची तरतूद, बालशिक्षणाला स्वतंत्र स्थान देऊन (म्हणजे तो शिक्षणखात्याच्या खर्चाचा भाग न मानता) दरसालच्या अर्थसंकल्पात करावी अशी समितीची शिफारस आहे. यामध्ये, आजपर्यंत जसे मानले जाते तसा बालशिक्षण हा प्राथमिक शिक्षणाचा उपभाग मानलाजाऊ नये, ही समितीची भूमिका आहे. आपला देशातील अनुभव असा आहे की जेव्हा खर्चात कपात करण्याची वेळ येते तेव्हा पहिली कात्री लावली जाते ती शिक्षणावरील खर्चाला. बालशिक्षण ही मूलभूत महत्त्वाची गोष्ट हे समाज आणि शासन मानणार असेल तर त्यावर अशी वेळ कदापीही येऊ नये, हीही एककल्पना समितीच्या मनात अशी शिफारस करताना आहे असे म्हणता येईल.

खरे तर बालशिक्षणावरील सर्व शिफारसींच्या अनुषंगाने होणारा खर्च करण्यासाठी समाजाने शासनाला सहाय्य करायला हवे आहे. अनेक उद्योगसंस्था, व्यापारसंस्था आणि मध्यम व उच्चमध्यम श्रीमंत वर्गांनी आपल्या सामाजिक बांधिलकीला प्रामाणिक राहून, परिसरातील बालशाळांची आर्थिक जबाबदारी घेतली पाहिजे. एका बालशाळेतील शिक्षिकेच्या पगाराचा, शाळेतील शैक्षणिक साधने आणि साहित्याचा नि मुलांना द्यावयाच्या दैनंदिन पोषक आहाराचा खर्च इतका अल्प असतो की तो शासनावर ढकलण्याऐवजी परिसरातील कुटुंबांनी सोसायचे ठरविले तर बालशिक्षणाला गुणांचे नि दर्जाचे, लवचीकतेचे नि प्रयोगशीलतेचे परिणाम सहजच प्राप्त करून देता येईल.

नाही तर गावपातळीवरील शाळांवर ग्रामसमित्यांनी लक्ष पुरवावे असे शासनाचे नवे शैक्षणिक धोरण सांगतेच. मग शहरी भागातील सुशिक्षितांनी आपल्या परिसर शिक्षणसमित्या निर्माण करून आपल्या जवळपासच्या लहानग्यांनी शालेयपूर्व शिक्षणाची सोय करणे अशक्य आहे काय? (महाराष्ट्र टाइम्स दि. ११ मार्च ९६ वरून) यशपाल समितीच्या शिफारशी

१. बालवाडी (अंगणवाडी) शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम आणि संस्था यासंबंधी सध्याच्या धोरणाचे परीक्षण करण्याची अ आवश्यकता आहे.

२.  मुलांना आनंददायक शिक्षणापासून वंचित करणाऱ्या, वैयक्तिक गुणांना पुरस्कार देणाऱ्या स्पर्धांना प्रतिसाद देणे कमी झाले पाहिजे.

३.  पूर्व बालशाळा ( शिशुशाळा ) उघडणे, तसेच त्यांचे संचालन  व नियमित करणे यासाठी उचित अशा कायदेशीर तसेच प्रशासकीय उपायांचा अवलंब करण्यात यावा.

४.   या शाळांना मान्यता देण्यासाठी जागा, शिक्षकवर्ग, उपकरणे, खेळसामुग्री या संबंधातील मापदंड ठरविण्यात यावेत.

५.   या संस्था लहान मुलांवर वाचन, लेखन, गणन अशा औपचारिक शिक्षणाचे ओझे अधिक प्रमाणात लादून अत्याचार तर करीत नाहीत ना, हे पाहिले गेले पाहिजे.

६.   बालवाडीत/ अंगणवाडीत प्रवेशासाठी मुलाखती आणि चाचणी परीक्षा घेण्याची पध्दत नाहीशी झाली पाहिजे.

राज्यस्तरीय बालशिक्षण समितीचा अहवाल (१९९६)

❖